18 JAN 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## ऑनलाईन एम.बी.ए. प्रवेश सूचना

## (जानेवारी २०२६ सत्र)

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत UGC व AICTE मान्यता प्राप्त ऑनलाईन एम.बी.ए. या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील जानेवारी २०२६ सत्रासाठीचे प्रवेश अर्ज दि. १६/०१/२०२६ पासून ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत. तरी पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश अर्ज ऑनलाईन पध्दतीने दि.२८/०२/२०२६ पर्यंत सादर करावेत.

याबाबतचा माहितीचा तपशील विद्यापीठ संकेतस्थळ https://online.unishivaji.ac.in/admissions/ यावर उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी अधिकच्या माहितीसाठी ०२३१ -२६०९४०९/२६०९१०५ या क्रमांकावर अथवा cdoe@unishivaji.ac.in या ई-मेलवर संपर्क साधावा.

प्रवेश घेण्याकरीता वरील QR Code स्कॅन करा.

जा.क्र. शिवाजी वि/सीडीओई/७४
दि. १८/०१/२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

18 JAN 2026

पुढारी

# शैक्षणिक परिसंस्था विकसित करण्यासाठी आधुनिक साधनांची गरज : डॉ. सोनकांबळे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शैक्षणिक परिसंस्था विकसित करण्यासाठी आधुनिक साधनांची गरज असल्याचे प्रतिपादन शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना प्र. सोनकांबळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (पीएम. उषा) 'ऑनलाईन अभ्यासक्रमाचे अध्यापनशास्त्र' या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यशाळेत सिम्बॉयसिस, पुणे येथील डॉ. अर्पिता कथाने, आयडिलायसर कन्टेन्ट सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड, पुणे येथील संस्थापक व संचालक डॉ. पंकज कथाने, डॉ. डी. वाय पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर येथील डॉ. सुरेश माने आणि तुळजाराम चतुरचंद कॉलेज ऑफ आर्टस् सायन्स अँड कॉमर्स, बारामती येथील डॉ. राहुल शहा या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. रुपाली संकपाळ तर श्रद्धा तांडेल, डॉ. अंजली गायकवाड सहसमन्वयक होत्या.

18 JAN 2026

पुढारी

# उद्यापासून 'इंडोलॉजी'वर मूल्यवर्धित अभ्यासक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अभ्यास केंद्राच्या वतीने १९ जानेवारी ते २३ जानेवारी या कालावधीत 'भारतीय विद्येचा परिचय' या विषयावरील पाच दिवसीय बहुविद्याशाखीय मूल्यवर्धित अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान, पुरातत्त्वशास्त्र आणि प्राचीन वारसा यांचा अभ्यास करणाऱ्या इंडोलॉजी (भारतीय विद्या) या विषयाची ओळख नव्या पिढीला व्हावी, या उद्देशाने हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. पाच दिवस चालणाऱ्या या सत्रांमध्ये सोनाली शहा, डॉ. योगेश प्रभुदेसाई, डॉ. तन्मय भोळे, योगिनी आत्रेय, डॉ. हर्षदा विरकुड, मानसिंग चव्हाण विचार मांडणार आहेत. या अभ्यासक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. नीलांबरी जगताप, इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. दत्तात्रय मचाले व डॉ. उमाकांत हत्तीकट यांनी केले आहे.

18 JAN 2026

सकाळ

# विद्यापीठात 'इंडोलॉजी' अभ्यासक्रम सुरू होणार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अभ्यास केंद्रातर्फे 'भारतीय विद्येचा परिचय' विषयावर १९ ते २३ दरम्यान बहुविद्याशाखीय मूल्यवर्धीत अभ्यासक्रम होत आहे. पाचदिवसीय सत्रात सोनाली शहा, डॉ. योगेश प्रभूदेसाई, डॉ. तन्मय भोळे, योगिनी आत्रेय, डॉ. हर्षदा विरकुड, मानसिंग चव्हाण विविध विषयांवर प्रकाश टाकणार आहेत. इच्छुकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. निलांबरी जगताप, डॉ. अवनीश पाटील, डॉ. दत्तात्रय मचाले, डॉ. हत्तीकट यांनी केले आहे.

18 JAN 2026

पुढारी



कोल्हापूर : पश्चिम विभागीय विद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धेत विजेतेप पटकावून शिवाजी विद्यापीठ संघाने सलग पाचव्या वर्षी ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध केली.

# शिवाजी विद्यापीठ संघ सलग पाचव्या वर्षी राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बनस्थळी विद्यापीठ राजस्थान येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय विद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संघाने विजेतेपद पटकावून सलग पाचव्या वर्षी ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध केली. अंतिम सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने रवींद्रनाथ टागोर विद्यापीठ भोपाळ संघाचा १५ धावांनी पराभव करून हे यश मिळविले.

विजयी संघात क्रिशी ठक्कर (कर्णधार), अक्षता नर्तवडेकर, सानिका पाटील, रसिका शिंदे, सृष्टी पोवार, ऋतुजा घबक, स्नेहल टकले, संस्कृती राठोड, अर्पिता नायकवडी, आकांशा राजने, वैदेही जोशी, श्रेया जेऊर, अनुजा खंडागळे, ऋतिका चतुरे, मिसबा सय्यद, प्राजक्ता घाटगे यांचा समावेश आहे. सर्वांना शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, संघ व्यवस्थापक प्रा. सुरेश फराकटे, प्रा. देवदत्त महात्मे, प्रा. सुचय खोपडे, प्रा. प्रकुल म. पाटील-मांगोरे, प्रा. श्वेता परुळेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

18 JAN 2026

सकाळ



कोल्हापूर : अखिल भारतीय विद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झालेल्या शिवाजी विद्यापीठ संघासोबत प्रशिक्षक उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठ महिला संघ राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी पात्र

कोल्हापूर, ता. १७ : राजस्थान येथील बनस्थळी विद्यापीठात सुरू असलेल्या पश्चिम विभागीय विद्यापीठ क्रिकेट (महिला) स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने सलग पाचव्यांदा अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला.

या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने भोपाळच्या रवींद्रनाथ टागोर विद्यापीठ संघाविरुद्ध पात्रता फेरीतील सामना झाला. या सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने १५ धावांनी मात करीत विजय मिळवला. या विजयी संघात क्रिशी ठक्कर, अक्षता नरतावडेकर, सानिका पाटील, रसिका शिंदे, सृष्टी पोवार, ऋतुजा घबक, स्नेहल टकले, संस्कृती राठोड, अर्पिता नायकवडी, आकांक्षा राजणे, वैदेही जोशी, श्रेया जेऊर, अनुजा खंडागळे, ऋतिका चतुरे, मिसबा सय्यद, प्राजक्ता घाटगे संघात समावेश होता. संघाला शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र- कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव व्ही.एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन, तर संघ व्यवस्थापक डॉ. सुरेश फराकटे, प्रा. देवदत्त महात्मे. प्रा. सुचय खोपडे, प्रा. प्रकुल पाटील मांगोरे, प्रा. श्वेता परुळेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

18 JAN 2026

सकाळ

# विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा सुरळीत

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबरमधील हिवाळी सत्रातील अकरा पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा ७२ केंद्रांवर शनिवारी सुरळीत झाल्या. परीक्षांसाठी दोन हजार ५८१ विद्यार्थी उपस्थित होते.

डिप्लोमा इन टॅक्सेशन, बी. टेक, एम. सी. ए, बी. फार्म, एम. टेक, एम. बी. ए-डिस्टन्स, बी. बी. ए/एम. बी. ए इंटिग्रेटेड, एम. ए. अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा त्यात समावेश होता. तसेच ३२ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले. आजअखेर ५२६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

18 JAN 2026

लोकमत

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## ■ ऑनलाईन एम.बी.ए. प्रवेश सूचना ■

### (जानेवारी २०२६ सत्र)

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत UGC व AICTE मान्यताप्राप्त ऑनलाईन एम.बी.ए. या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील जानेवारी २०२६ सत्रासाठीचे प्रवेश अर्ज दि. १६/०१/२०२६ पासून ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहेत. तरी पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीने दि. २८/०२/२०२६ पर्यंत सादर करावेत.

याबाबतचा माहितीचा तपशील विद्यापीठ संकेतस्थळ https://online.unishivaji.ac.in/admissions/ यावर उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी अधिकच्या माहितीसाठी ०२३१-२६०९४०९/२६०९१०५ या क्रमांकावर अथवा cdoe@unishivaji.ac.in या ई-मेलवर संपर्क साधावा.

प्रवेश घेण्याकरिता वरील QR Code स्कॅन करा.

जा.क्र. शिवाजी वि/सीडीओई/७४
दि. १८/०१/२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

18 JAN 2026 सकाळ

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

# शिक्षणशास्त्र अधिविभागात दोनदिवसीय कार्यशाळा

कोल्हापूर : 'शैक्षणिक परिसंस्था विकसित करण्यासाठी आधुनिक साधनांची आवश्यकता आहे', असे प्रतिपादन शिक्षणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत 'ऑनलाईन अभ्यासक्रमाचे अध्यापनशास्त्र' विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यशाळेत पारंपरिक व ऑनलाईन वर्ग व्यवस्थापनासाठी आवश्यक सैद्धांतिक पार्श्वभूमी आणि प्रात्यक्षिकांवर आधारित व्याख्याने झाली. डॉ. अर्पिता कथाने, डॉ. पंकज कथाने, डॉ. सुरेश माने व डॉ. राहुल शहा यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी समन्वयक डॉ. रूपाली संकपाळ, श्रद्धा तांडेल, डॉ. अंजली गायकवाड, डॉ. विद्यानंद खंडागळे उपस्थित होते.

18 JAN 2026

जनप्रवास

# शैक्षणिक परिसंस्थांच्या विकासासाठी आधुनिक साधनांची आवश्यकता

## शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांचे मत

**जनप्रवास : कोल्हापूर**

शैक्षणिक परिसंस्था विकसित करण्यासाठी आधुनिक साधनांची आवश्यकता आहे, असे मत शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (पीएम. उषा) 'ऑनलाईन अभ्यासक्रमाचे अध्यापनशास्त्र' या 'विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना त्या बोलत होत्या.

कार्यशाळेत पारंपरिक तसेच ऑनलाईन वर्गव्यवस्थापनासाठी आवश्यक सैध्दांतिक पार्श्वभूमी आणि प्रात्यक्षिकांवर आधारित व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत.

यात सिम्बॉयसिस, पुणे येथील डॉ. अर्पिता कथाने, आयडिलायसर कन्टेन्ट सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड, पुणे येथील संस्थापक व संचालक डॉ पंकज कथाने, डॉ. डी. वाय पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, कोल्हापूर येथील डॉ. सुरेश माने आणि तुळजाराम चतुरचंद कॉलेज ऑफ आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स, बारामती येथील डॉ. राहुल शहा या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. रुपाली संकपाळ असून म्हणून श्रध्दा तांडेल, डॉ. अंजली गायकवाड सहसमन्वयक आहेत. याप्रसंगी डॉ. विद्यानंद खंडागळे उपस्थित होते.

18 JAN 2026 पुण्यनगरी
जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

# सकारात्मक अभिव्यक्तीतून माणूसपणाची घडण

## – डॉ. आलोक जत्राटकर

**कोल्हापूर :** सकारात्मक अभिव्यक्तीमधून माणूसपण घडत जाते आणि मानवतेच्या कक्षा रुंदावतात, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी केले.


शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील अंतर्गत शिक्षकांमध्ये गुणवत्ता व कौशल्यवृद्धीसाठी बातमी लेखन याविषयी डॉ. जत्राटकर यांचे विशेष व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील होते. डॉ. जत्राटकर म्हणाले, अभिव्यक्ती ही मानव असण्याची




पूर्वअट आहे. त्यासाठी भोवतालामधून प्रेरणा घेऊन आपल्या वाचन, लेखन आदी अभिव्यक्तीच्या दिशा शोधाव्या लागतात. अनुभव आणि सातत्य यामधून ही कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे.

यावेळी डॉ. नितीन रणदिवे यांनी स्वागत केले. डॉ. सचिन भोसले यांनी परिचय करून दिला. संदीप थिटे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नगीना माळी यांनी आभार मानले. उपकुलसचिव विनय शिंदे, समन्वयक डॉ. चांगदेव बंडगर आदी उपस्थित होते.

18 JAN 2026
जनप्रवास



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रसाद कुलकर्णी. सोबत डॉ. रणधीर शिंदे, संगीता पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे.

# नवभारताचे उदात्त स्वप्न हा एन. डी. सरांचा ध्यास



● प्रसाद कुलकर्णी यांचे प्रतिपादन

जनप्रवास : कोल्हापूर

प्रबोधन परंपरेतील कृतिशील विचारांचा नेता म्हणून एन. डी. सरांचे योगदान महाराष्ट्राच्या इतिहासात महत्त्वाचे आहे. सामान्य माणसांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी त्यांनी चळवळी उभारल्या. निद्रिस्ताला जागे करणे हीच त्यांची प्रबोधनाची व्याख्या होती. सत्याचा आग्रह धरून त्यांनी हस्तक्षेपाचे राजकारण केले. त्यासाठी प्रबोधन विचारांची मूल्यव्यवस्था स्वीकारून ती रुजविण्यासाठी अथक प्रयत्न केले. नवभारताचे उदात्त स्वप्न हा त्यांचा ध्यास होता, असे प्रतिपादन प्रसाद कुलकर्णी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासन आयोजित स्मृतिदिनानिमित्त 'प्रा. एन. डी. पाटील: विचारविश्व आणि प्रबोधन' या विषयावर ते बोलत होते, अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

प्रसाद कुलकर्णी म्हणाले, सामाजिक बांधिलकी ही फक्त त्यांच्या बोलण्यात नव्हती. तिचा कृतिशील पाठपुरावा त्यांनी सातत्याने केला. रस्त्यावरची लढाई खेळणारे ते लढवय्या होते. तत्त्वनिष्ठ नैतिकता हा त्यांच्या जीवनाचा मूलाधार होता. गेल्या साठ वर्षांतील चळवळींचा इतिहास जर लिहायचा झाला, तर त्यात एन. डी. सरांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

डॉ. शिंदे अध्यक्षीय मनोगतात म्हणाले, तत्त्वांशी तडजोड न करता संवाद साधत समाजहिताची उभारणी करणे हा एन. डी. सरांचा सर्वात मोठा गुण होता. विधायक कामासाठी ते नेहमी पुढाकार घेत राहिले. महाराष्ट्राच्या प्रबोधन चळवळीला त्यांच्या कार्याचे सदैव स्मरण राहील.

यावेळी एन. डी. पाटील यांच्या स्नुषा संगीता पाटील यांनी प्रा. एन. डी. पाटील यांच्या आठवणी सांगितल्या. मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. बळवंत मगदूम, डॉ. पी. टी. सावंत, डॉ. दीपक भादले, मतीन शेख, सोनाली जाधव, आदी उपस्थित होते.

18 JAN 2026

पुण्यनगरी

# शैक्षणिक परिसंस्था विकासासाठी आधुनिक साधने आवश्यक

## – डॉ. सोनकांबळे

**कोल्हापूर :** शैक्षणिक परिसंस्था विकसित करण्यासाठी आधुनिक साधनांची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (पीएम उषा) 'ऑनलाईन अभ्यासक्रमाचे अध्यापनशास्त्र' या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी पारंपरिक, तसेच ऑनलाईन वर्ग व्यवस्थापनासाठी आवश्यक सैद्धांतिक पार्श्वभूमी आणि प्रात्यक्षिकांवर आधारित व्याख्याने आयोजित करण्यात आली. यात सिम्बॉयसिस, पुणे येथील डॉ. अर्पिता कथाने,



आयडिलायसर कन्टेन्ट सोल्युशन पुणे येथील संस्थापक डॉ. पंकज कथाने, डॉ. डी. वाय पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथील डॉ. सुरेश माने आणि तुळजाराम चतुरचंद कॉलेज ऑफ आर्टस् सायन्स अँड कॉमर्स, बारामती येथील डॉ. राहुल शहा यांनी मार्गदर्शन केले. समन्वयक डॉ. रूपाली संकपाळ, सहसमन्वयक श्रद्धा तांडेल, डॉ. अंजली गायकवाड आहेत. डॉ. विद्यानंद खंडागळे यांच्यासह अधिविभागातील शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

18 JAN 2026
सकाळ


# सकारात्मक अभिव्यक्तीतून माणूसपण घडते : डॉ. अलोक जत्राटकर

कोल्हापूर : सकारात्मक अभिव्यक्तीमधून माणूसपण घडते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील अंतर्गत शिक्षकांत गुणवत्ता व कौशल्यवृद्धीसाठी बातमी लेखन विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील अध्यक्षस्थानी होते. जत्राटकर म्हणाले, 'अभिव्यक्ती ही मानव असण्याची पूर्वअट आहे. त्यासाठी भोवतालामधून प्रेरणा घेऊन वाचन, लेखन या अभिव्यक्तीच्या दिशा शोधाव्या लागतात.' उपकुलसचिव विनय शिंदे, डॉ. चांगदेव बंडगर उपस्थित होते. डॉ. नितीन रणदिवे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सचिन भोसले यांनी परिचय करून दिला. संदीप थिटे यांनी सूत्रसंचालन केले.

18 JAN 2026

जनप्रवास




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. अलोक जत्राटकर. सोबत डॉ. कृष्णा पाटील.

# सकारात्मक अभिव्यक्तीतून माणूसपण घडते

**जनप्रवास : कोल्हापूर**

- शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांचे प्रतिपादन

सकारात्मक अभिव्यक्तीमधून माणूसपण घडत जाते आणि मानवतेच्या कक्षा रुंदावतात, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील अंतर्गत शिक्षकांमध्ये गुणवत्ता व कौशल्यवृद्धीसाठी बातमीलेखन या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील होते.

डॉ. जत्राटकर म्हणाले, अभिव्यक्ती ही मानव असण्याची पूर्वअट आहे. त्यासाठी भोवतालामधून प्रेरणा घेऊन आपल्या वाचन, लेखन आदी अभिव्यक्तीच्या दिशा शोधाव्या लागतात. अनुभव आणि सातत्य यामधून ही कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. बातमी लेखन ही एक शैलीदार कला असून हे कौशल्य प्रत्येकाला सरावातून विकसित करता येते. यावेळी त्यांनी संज्ञापन, बातमीलेखन, वार्तामूल्ये, लेखनाचे प्रकार, बहुमाध्यमी बातमीचे स्वरुप इत्यादींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

डॉ. नितीन रणदिवे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सचिन भोसले यांनी परिचय करून दिला. संदीप थिटे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नगीना माळी यांनी आभार मानले. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, समन्वयक डॉ. चांगदेव बंडगर आदी उपस्थित होते.